सुरक्षा विभाग.
दि. /०१/०२०२३.

**प्रस्तवना :-**

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत सुरक्षा सेवेसाठी कार्यरत असलेली महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांच्या सुरक्षा सेवेची मुदत ३ वर्षाकरीता वाढविणे व त्याकामी सन २०२३-२६ या वर्षाकरीता लागणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयान्वये, कोणत्याही संस्थेचा सुरक्षा हा महत्वाची भाग असून, भिवंडी महानगरपालिकेची ईमारत, महापौर कार्यालय व आयुक्त कार्यालय, उप-आयुक्त (मुख्या.) कार्यालय, अति-आयुक्त कार्यालय, प्रभाग समिती क्र. ०१ ते ०५ , मा.महापौर निवास व मा. आयुक्त निवास तसेच अतिक्रमण हटविणे करीता, भिवंडी महानगरपालिकेत येणारे मोर्चे या करीता सुरक्षा, तसेच सद्यःस्थितीत कोव्हिड १९ ची साथ पुन्हा वाढते आहे. त्यामुळे कोव्हिड सेंटर येथे सुरक्षा पुरविणे आवश्यक आहे. याकरीता भिवंडी महानगपालिकेला सुरक्षा असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हि शासनाची सुरक्षा सेवा असल्यामुळे ई-टेंडरची आवश्यकता वाटत नाही.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत सद्यःस्थितीत सुरु असलेल्या सुरक्षा रक्षकांची सेवा ही महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, यांच्या कडुन दि. १२/०५/२०१७ पासून घेण्यात आलेली आहे. व सदर सुरक्षा सेवेची मुदत दि.२०/०२/२०२३ रोजी संपणार आहे. उक्त सुरक्षा सेवेचे व करारनाम्याचे दरवर्षी नुतनीकरण प्रशासनाची मान्यता घेतली जाते. महाराष्ट्र शासन निर्णय सन २००६ व २०१० नुसार शासनाची सुरक्षा सेवा घेणे अनिर्वाय आहे. उक्त सुरक्षा सेवेचे अध्यक्ष मा. सिताराम कुंटे सा○. (भा.प्र.से., अति.मुख्य गृहसचिव) तसेच मा. संजय पांडे सो.भा.पो.से., पोलिस महासंचालक आहेत.

**वरील ३४ सुरक्षा रक्षकांचे मासिक वेतन - वार्षिक वेतन - जी एस.टी सह तक्ता खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पद | प्रत्येकी मासिक वेतन | संख्या | एकूण मासिक वेतन (एक महिन्याचे) |
|---|---|---|---|---|
| १ | सहा.सुरक्षा अधिकारी (ASO) | ३०,०००/- | ०१ | रु. ३०,०००/- |
| २ | हेडगार्ड (HG) | २४,०००/- | ०४ | रु. ९६,०००/- |
| ३ | आर्मगार्ड (ASG) | २६,०००/- | ०७ | रु. १,८२,०००/- |
| ४ | लेडीजगार्ड (LSG) | २३,०००/- | ०२ | रु. ४६,०००/- |
| ५ | सुरक्षा गार्ड (SG) | २३,०००/- | २० | रु. ४,६०,०००/- |
| | | एकूण रुपये | ३४ | रु. ८,१४,०००/- |
| | | | | |
| | ०९ % सी.जी.एस.टी. सह | | | रु. ७३,२६०/- |
| | ०९ % एस.जी.एस.टी. सह | | | रु. ७३,२६०/- |
| | मासिक वेतन जी.एस.टी. सह, एकूण रुपये. | | | रु. ९,६०,५२०/- |
| | | | | |
| | वार्षिक वेतन जी.एस.टी.सह, एकूण रुपये | | | रु. १,१५,२६,२४०/- |

**एकूण वार्षिक जी.एस.टी.सह अंदाजे खर्च रु. १,१५,२६,२४०/- अपेक्षित आहे. त्यानुसार ३ वर्षाकरिता अंदाजे खर्च जी.एस.टी.सह रु. ३,४५,७८,७२०/- अपेक्षित खर्च प्रतावित आहे.**

उक्त सुरक्षा सेवा व करारनाम्याची मुदत दि. २१/०२/२०२३ ते दि. २०/०२/२०२६ पर्यंत अशी तिन वर्षांकरिता वाढविणे बाबत प्रशासक तथा मा. आयुक्त सा○. यांनी मंजूरी देणेत आलेली आहे.

उक्त सुरक्षा सेवा गरजेची असल्याचे त्याकामी रक्कम रु करारनाम्याची मुदत **दि. २१/०२/२०२३ ते दि. २०/०२/२०२६** पर्यंत वाढविणे व प्रशाकीय ठराव करुन मा. प्रशासक तथा आयुक्त सा◌ो. यांचे मंजूरीकरीता सादर करण्यात आलेले आहेत. सदर प्रस्ताव सुरक्षा अधिकारी, उप-आयुक्त(सुरक्षा), मुख्य लेखापरिक्षक मुख्य लेखा कनिष्ठ अधिकारी तसेच अति आयुक्त केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा उपायुक्त महोदय यांनी दि. / / . रोजी सदर कामास प्रशाकीय ठराव करुन घेणेस मान्यता दिलेली आहे. याकामी सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये प्रशाकीय ठराव करणे कामी मंजूरीस्तव सविनय सादर...!

**प्रशाकीय ठराव क्र :-** ९० **दिनांक :-** ८/२/२०२३

उपरोक्त विषयांकित कामी **तिन वर्षाकरिता** अंदाजे रक्कम रु **३,४५,७८,७२०/-** इतक्या रक्कमेचे प्रस्ताव तयार करुन प्रशाकीय मंजूरीकरण सादर करण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग कडील शासन आदेश क्र. एनसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)/नवि-१४, दिनांक :- ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र कलम ४५२ अ (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरील कामी येणा-या खर्चास अंदाजे रक्कम **रु ३,४५,७८,७२०/-** च्या प्रस्तावास प्रशाकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका.**